# ग्रामपंचायत बेडगाव

पंचायत समिती कोरची, जिल्हा परिषद गडचिरोली

**ई-निविदा सुचना क्र: 2026-27/B1/010**

ग्रामपंचायत बेडगाव, पंचायत समिती कोरची, जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत खालील काम/कामे पूर्ण करण्याकरीता खालील अटी व शर्तीचे अधिन राहून इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदारांकडून द्विलिफाफा पद्धतीने ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे.

## कामांची माहिती

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची शेड्युल किंमत | टेंडर फी | प्रोसे. फी | इसारा रक्कम 1% | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Special Repair to Existing Water Supply Scheme at Village Bedgaon, GP Bedgaon, Tah. Korchi | 680909 | 1000 | 500 | 6809 | 3 महिणे | वर्ग 7 व त्यावरील |

## अटी व शर्ती

1. ई-निविदा फक्त ऑनलाईन पद्धतीनेच www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर सादर करण्यात यावे, त्याव्यतिरीक्त कोणत्याही प्रकारे सादर केलेली निविदा स्विकारल्या जाणार नाही.
2. ई-निविदा फी व इसारा रक्कम ही फक्त ऑनलाईन पद्धतीनेच संकेतस्थळावर भरण्यात यावी, त्याव्यतिरीक्त कोणत्याही प्रकारे सादर केलेली रक्कम स्विकारल्या जाणार नाही.
3. दिनांक 15/08/2024 पासुन ई-निविदा फी व इसारा रक्कमे व्यतिरीक्त शासनाकडून महाटेंडर पोर्टल अप्लिकेशन चार्जेस म्हणून अतिरिक्त रु.500/- शुल्क निविदाधारकांकडून आकारले जाणार आहेत. तरी याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी
4. कंत्राटदाराने ई-निविदा सादर केले असता, त्यांनी संपूर्ण अटी व शर्तीचे वाचन करुनच ई-निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतले असल्याचे गृहीत धरण्यात येईल व त्यांना या प्रसिध्दिपत्रकातील सर्व अटी व शर्ती बिनशर्त मान्य असल्याचे गृहीत धरण्यात येईल.
5. कंत्राटदाराने ई-निविदा सादर करतांना तांत्रिक लिफाफा मध्ये खालील कागदपत्रांच्या मुळ प्रती स्कॅन करुन, दिलेल्या अनुक्रमाने एकत्रिक करुन त्यांची PDF तयार अपलोड करण्यात यावी. व अनावश्यक कागदपत्रे जोडू नये.
   (1) ई-निविदा फी व इसारा रक्कम भरल्याची पावती, (2) पंजियन प्रमाणपत्र (जिल्हा परिषद), (3) व्यवसाय कर प्रमाणपत्र सन 2026-27 पर्यंत वैध असलेले, (4) जीएसटी प्रमाणपत्र, (5) पॅनकार्ड, (6) ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र, (7) कागदपत्रे खरे असल्याचे सत्यप्रतिज्ञापत्र स्टँपपेपरवर, (8) कंत्राटदाराचे फर्मच्या लेटरहेडवर संपर्कासाठी एका अधिकृत प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर ची यादी.
6. जर दोन किंवा त्यापेक्षा अधिक समान न्यूनतम दर प्राप्त झाल्यास, System Generated BOQ Comparative Chart न्यूनतम दराची निविदा न्यूनतम प्रमाण मानून स्विकारण्यात येईल. याबाबत कंत्राटदारांची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
7. वरीलप्रमाणे स्विकारण्यात आलेला न्यूनतम दर (L1) जर 10% पेक्षा अधिक दराने कमी असल्यास, स्विकारण्यात आलेल्या दिनांकपासून 8 दिवसांचे आत पुढीलप्रमाणे अतिरीक्त सुरक्षा रक्कम (Additional Performance Security Deposit) म्हणून ग्रामपंचायत कार्यालयात DD/FDR/BG स्वरुपात जमा करणे बंधनकारक राहील. ही 8 दिवसांची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथिलक्षम राहणार नाही. अन्यथा दुसऱ्या क्रमांकाच्या न्यूनतम दर (L2) सादर करणाऱ्या कंत्राटाराला काम करण्याबाबत विचारणा करण्यात येईल. (जर ही रक्कम रु. 1000/- पेक्षा कमी असल्यास किमान रु. 1000/- ची राष्ट्रीयकृत बँकेची DD/FDR/BG सादर करणे अनिवार्य राहील)

   A) जर प्राप्त दर निविदाधीन कामाच्या रक्कमेपेक्षा 10% पेक्षा कमी दराची असले तर कंत्राटदारांनी निविदाधीन किमतीच्या 1% एवढ्या किंतीची Additional Performance Security Deposit सादर करावी.
   उदा. 1% ते 10% कमी दर असेल तर = निविदाधीन रक्कमेच्या 1% रक्कम

B) जर प्राप्त दर निविदाधीन कामाच्या रक्कमेपेक्षा 10% पेक्षा जास्त दराची असले तर कंत्राटदारांनी तेवढ्या रक्कमेचा व बाब (A) प्रमाणे Additional Performance Security Deposit सादर करावी.
उदा. 14% कमी दर सादर केले असल्यास, 1% ते 10% कमी दर असेल तर निविदाधीन रक्कमेच्या 1% रक्कम.
व 14% - 10% = 4%, असे, 1% + 4% = 5%

C) जर प्राप्त दर निविदाधीन कामाच्या रक्कमेपेक्षा 15% पेक्षा कमी दर सादर केल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम राष्ट्रीयकृत बँकेची DD/FDR/BG द्वारे सादर करणे अनिवार्य राहील.
उदा. 19% कमी दरासाठी खालीलप्रमाणे पृथकरण,
1% ते 10% कमी दर असेल तर निविदाधीन रक्कमेच्या 1% रक्कम. 15% पर्यंत कमी दरापर्यंत, 15-% - 10% = 5%
तसेच 19% - 15% = 4% करीता 4X2 = 8%, असे, एकुण 1% + 5% + 8% = 14%

8 ई-निविदा उघडण्याकरीता शासन निर्णय : ग्रामविकास विभाग, क्र.निविदा-2012/प्र.क्र.97/पंरा-7, दिनांक 23 सप्टेंबर 2013 मध्ये दिलेल्या सुचनानुसार कार्यवाही करण्यात येईल.

9 निविदा रद्द किंवा नामंजुर करण्याचे सर्व अधिकार खालील प्रधिकर्त्यांकडे राखुन ठेवण्यात आले आहे. कंत्राटदाराने साईट व्हिजीट प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक राहील. तसे न केल्यास निविदा तांत्रिक पडताळणीमध्ये नामंजुर करण्यात येईल.

10 कंत्राटदाराने बांधकामे विहीत मुदतीत पूर्ण न केल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक/जिपग/बांवि/सलेअ/दंड आकारणी/6137/2020, दिनांक 26/11/2020 अन्वये कंत्राटदारांकडून दंड वसूल करण्यात येईल.

11 उपरोक्त कामाकरीता लागणारी गौण खनिजांची रॉयल्टीची रक्कम कंत्राटदारालाच भरणा करावी लागेल. व त्या चलनाची प्रत देयकांसोबत सादर करावी लागले. अन्यथा ती देयकांतून कपात करण्यात येईल.

12 तसेच गौणखनिजांचे उपलब्धता करुन कामे सुरु करण्याची जबाबदारी कंत्राटदारांची असून, गौण खनिजांच्या अनुपलब्धतेमुळे काम सुरु करण्यास उशिर झाल्यास किंवा काम विहित मुदतीत पुर्ण न झाल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदार जबाबदार राहील. व शासकीय नियमानुसार कंत्राटदाराकडून दंड आकारण्यात येईल.

13 कामाकरीता वापरण्यात येणाऱ्या साहित्यांची Testing Report देयकांसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

14 कामाचा विमा व कामावर असलेल्या मजुरांचा विमा शासन प्राधिकृत विमा कंपनीकडून उतरवून घ्यावा लागेल व त्यांच्या प्रती बिलाची अदायगी करतेवळी सोबत जोडावी लागेल.

15 बाजारातील दरातील तफावतीनुसार वाढीव दर अनुज्ञेय राहणार नाही.

16 देयकांचे भुगतान शासनाकडून प्राप्त अनुदानाचे उपलब्धतेनुसार करण्यात येईल. कंत्राटदाराला अग्रीम रक्कम देण्यात येणार नाही. तसेच 30:30:40 प्रमाणात रक्कम अदा करण्यात येईल.

17 काम पुर्ण झाल्यानंतर सदर बांधकामाचे मुल्यांकन जि.प. अंतर्गत बांधकाम विभागाकडून केल्यावर व काम पुर्ण झाल्याचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय कामाचे देयके अदा केले जाणार नाही.

18 बांधकाम पुस्तीकेमध्ये नोंद घेऊन संबंधित तांत्रिक अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन, कामाचे फोटो, आर.ए. बिल व इतर संबंधित आवश्यक कागदपत्रे सादर करावे लागले व त्यांच्या मंजुरी नंतरच आवश्यक कपाती करुन देयके अदा करण्यात येईल.

19 निविदा मान्य झालेल्या कंत्राटदाराला दोष निवारण कालावधी पर्यंत कामाचे देखभाल व दुरुस्तीचे काम करावे लागतील, तसे न केल्यास, कंत्राटदाराने सादर केलेली अनामत रक्कम व सुरक्षा रक्कमा जप्त करण्यात येईल.

20 निविदा संबंधीचे महत्वाचे दिनांक व वेळ व शुद्धीपत्रके www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**प्राधिकृत अधिकाऱ्यांची सही**

- स्वा -

प्रशासक / सचिव

ग्रामपंचायत बेडगाव

Signature Not Verified

Digitally signed by CHETANAND DEVNATH KIRSAN
Date: 2026.05.18 14:59:27 IST
Location: Maharashtra-MH